# चाईल्डहूड डेज
# अ मेमॉयर

**सत्यजित राय**

अनुवाद

**डॉ. प्रसन्न मंगरूळकर**

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

Childhood Days A Memoir : Satyajit Ray
Marathi translation by Dr. Prasanna Mangrulkar
First published in English by Penguin Books India in 1998
Copyright © The Estate of Satyajit Ray 1998
First published in Marathi by Riya Publications in arrangement with Penguin Books India.

**चाईल्डहूड डेज अ मेमॉयर :** सत्यजित राय

अनुवाद : डॉ. प्रसन्न मंगरूळकर

**प्रकाशक**

रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**अनुवाद**

डॉ. प्रसन्न मंगरूळकर
छत्रपती शिवाजी महाराज वस्तू संग्रहालय
१५९-१६१, महात्मा गांधी रोड, फोर्ट, मुंबई - ४०००२३
मो. नं. : ९८६००२३२७५

**अक्षरजुळणी**

अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**

चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**

ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**

ऑगस्ट २०१६

**किंमत**

₹ २२०/-

# चाईल्डहूड डेज
# अ मेमॉयर

## प्रस्तावना

आपल्या बालपणीच्या स्मृतींचा कुठला भाग चिरंतन राहणार आणि कुठला मागे काही अवशेषही न सोडता कायमचा नष्ट होणार, हे सांगता येणार नाही. याशिवाय आठवणींवर नियंत्रण ठेवण्यासाठी कुठले काटेकोर नियमही नाहीत. याचमुळे हा सगळा एक रहस्यमय मामला होतो. गोडपार इथलं माझं जन्मस्थान असलेलं घर सोडून आम्ही जेव्हा भोबानिपूरच्या घरी राहायला गेलो, त्यावेळी मी पाच वर्षांचा होतो. ज्या दिवशी आम्ही घर सोडलं त्या दिवसाचं मला काही आठवत नाही; पण तिथे राहत असताना एका रात्री मी पाहिलेलं स्वप्न मला आठवतंय. त्यात आमच्या स्वयंपाक्याचा मुलगा होरेन दिसला आणि त्याशिवाय त्यात लक्षात ठेवण्यासारखं विशेष काही नव्हतं; पण तरीही मला ते स्पष्टपणे आठवतं.

या माझ्या स्मृतिकथांमध्ये काही सामान्य घटना आणि सामान्य लोकांसह असामान्य घटनांचं आणि लोकांचंही वर्णन आहे. साधारण-असाधारण असा प्रभेद मोठे करतात, छोटे नाही. यामुळेच मोठ्यांसारखे छोटे ना आपल्या मित्रांची निवड करतात ना मोठ्यांचे निकष समजू शकतात किंवा अमलात आणतात.

या स्मृतिकथा प्रथम शॉन्देश पोत्रिकेत दोन भागात प्रकाशित झाल्या होत्या. नंतर अजून काही घटना आणि लोक आठवले म्हणून त्यांचा समावेश यात केला.

✦✦✦

## बिजोया राय यांचे मनोगत

माझ्या पतीच्या कार्याशी वा व्यक्तिमत्त्वाशी अगदी दूरान्वयानेही ज्या कोणाचा संबंध आला असेल, ते पुरेपूर जाणून असतील की, त्याच्याबद्दल केवळ उत्सुकताच नव्हे, तर एक कौतुकमिश्रित आदराची भावना मनात जागृत होत असे. कदाचित, प्रत्येक लोकप्रिय व्यक्तीबद्दल तिच्या चाहत्यांना 'प्रत्यक्षाहून प्रतिमा उत्कट' हाच अनुभव येत असेल.

तरी पण, जे त्याला जवळून ओळखत होते, त्यांना खरं तर ही जाणीव होती की, तो जसा भासतो त्यापेक्षा तो अगदी विरुद्ध होता. जो मनुष्य सर्वांमध्ये मोठा होता, केवळ शारीरिक उंचीनेच नव्हे, तर सर्वार्थानेही इतरांना लांबचा, अलिप्त असा वाटू शकतो, त्याच्या आप्तांना आणि स्नेह्यांना तो इतर सामान्य व्यक्तींहून वेगळा नव्हता तर आपुलकीयुक्त, प्रेमळ, मैत्रीपूर्ण, साहाय्यतत्पर आणि इतरांना हसण्याची जेवढी गरज असते तेवढीच गरज असणारा होता. त्याच्याबरोबर काम केलेल्या आणि त्याला जवळून ओळखत असणाऱ्या बऱ्याच जणांनी मला सांगितलंय की, त्यांच्या आठवणीत त्याचं स्मितहास्य आणि विनोद कळल्यावर सात मजली हास्यच अधिक आहे.

माणिकची कौटुंबिक पार्श्वभूमी पाहता त्याच्या स्वभावात असणारी विनोदबुद्धी आणि जीवनाबद्दल आपुलकी, युक्त, सकारात्मक दृष्टिकोन या दोन गोष्टी त्याच्या रक्तातच होत्या, याबद्दल संशय राहत नाही. उपेन्द्रोकिशोर यांचा नातू आणि शुकुमार राय यांचा मुलगा मानवतावादी नसता तरच नवल होतं. त्याचे चित्रपट त्याला लोकांबद्दल वाटणारी काळजी आणि अनुकंपा यांची पुरेपूर साक्ष देतात. परंतु, माझ्या लेखी तो जेव्हा 'शॉन्देश पोत्रिके'त, ज्याचं त्यांनी १९६१ पासून पुनर्प्रकाशन सुरू केलं, मुलांसाठी लिखाण करू लागला, तेव्हापासून तो त्याच्या चाहत्यांच्या जास्त जवळ पोहोचला. प्रौढ जरी त्याच्यासोबत हातचं राखून वागत

होते तरी लहान मुलं त्याला त्यांची सुख-दु:खं समजून घेणारा आणि सतत त्यांचा पक्ष घेणारा असा आपला मित्र मानायला कचरत नव्हती.

नेमक्या याच कारणासाठी माणिकच्या बालपणाबद्दल उत्सुकता सदोदित वाढत गेली. माणिकला सहसा स्वत:बद्दल बोलायला फारसं आवडत नसे. कुणी जर त्याबद्दल थेट प्रश्न विचारलाच तर त्याचं उत्तर तो अवश्य देई; पण मोजक्या शब्दांत. त्यामुळे, केव्हा आणि कुठे त्याचा जन्म झाला, तो कुठे राहत होता आणि कुठल्या शाळेत शिकला ही जुजबी माहिती सगळ्यांना होती. परंतु, त्याचं बालपण कसं गेलं, त्याचे विचार कसे होते, तो कोणाबरोबर खेळला, त्याचं कुटुंब कसं होतं, त्याच्या आवडीनिवडी काय होत्या आणि प्रौढपणी तो जसा होता त्याचं बीज त्याच्या बालपणात कसं पेरलं गेलं यांसारख्या प्रश्नांची उत्तरं त्यातून मिळत नव्हती.

जॉखोन छोटो छिलाममधून (जेव्हा मी छोटा होतो) या प्रश्नांची त्यानं उत्तरं दिली जी शॉन्देशमध्ये क्रमवार प्रकाशित झाली होती. त्याच्या संपूर्ण लिखाणातला हाच एक भाग होता, ज्यामध्ये तो स्वत:बद्दल आणि त्याच्या कुटुंबाबद्दल काही तरी सांगतो. ही संक्षिप्त वर्णनं एवढ्या मोठ्या प्रमाणात लोकांनी का वाचली याचा शोध घेणं फारसं कठीण नाही. शॉन्देशचे वाचक, ज्यांच्यासाठी आठवणींचा हा ठेवा एकवटला होता, त्यांच्या मासिकाचा प्रसिद्ध संपादक आणि महान फेलुदा आणि शोंकू यांचा जन्मदाता त्यांच्यासारखाच एक सामान्य आनंदी मुलगा होता या जाणिवेने सुखावले होते. त्यांच्यासारखाच तोही मोठ्यांच्या तऱ्हेवाईक वागण्यामुळे लहानपणी प्रसंगी बावचळून गेला होता आणि वरून उलट प्रश्न न विचारायलाही शिकला होता. अनेक लहान मुलांप्रमाणे त्यालाही भीती वाटत असणाऱ्या शिक्षकांना तोंड द्यावं लागत होतं. तसंच, वर्गमित्रांच्या चिडवाचिडवीतून त्याचीही सुटका नव्हती, कारण त्यांच्या लेखी त्याच्या कौटुंबिक पार्श्वभूमीला काडीचंही महत्त्व नव्हतं. प्रौढ वाचकांसाठी आठवणीचा हा ठेवा एका प्रसिद्ध चित्रपट निर्माता-दिग्दर्शकाचं आणि लेखकाचं मन, उमलत्या वयात आकार घेणाऱ्या त्याच्या कल्पना आणि विश्वास इत्यादी माहीत करून घेण्यासाठी एक मर्मदृष्टी उपलब्ध करून देत असे. ज्यांना शॉत्तोजित राय यांच्याबद्दल लेख आणि पुस्तकं लिहायची असत, त्यांच्यासाठी जॉखोन छोटो छिलाम एक महत्त्वाचा संदर्भ ग्रंथ ठरू लागला.

त्याच्या प्रकाशनानंतर अल्पावधीतच संपूर्ण संग्रहाचा इंग्रजी अनुवाद प्रकाशित करण्याचे प्रस्ताव भारत आणि विदेशातल्या निरनिराळ्या लोकांकडून माणिकला मिळू लागले. त्याला दिल्या गेलेल्या मोठेपणामुळे विरघळून जाऊन प्रकाशनाची संमती देईलच अशा फाजिल आत्मविश्वासाने काहींनी तर त्याचा अनुवाद थेट माणिकलाच पाठवण्यापर्यंत मजल मारली. या अनुवादांचा दर्जा जर त्याच्या पसंतीस उतरला असता तर त्याने संमती द्यायचा विचार केलाही असता. दुर्दैवाने, अशी परिस्थिती नव्हती. तरीही हा संग्रह उचितपणे अनुवादित झालाच तर बऱ्याच मोठ्या प्रमाणात त्याचं स्वागत केलं जाईल याची स्पष्ट जाणीव आम्हा उभयतांना होती.

शेवटी आपण स्वत:च अनुवाद करावा असा निर्णय माणिकनी घेतला; परंतु चित्रपटांच्या कामांचा डोंगर आणि त्याची स्वत:ची ढासळती प्रकृती यामुळे ते शक्य झालं नाही. १९९२ मध्ये त्याचं निधन झाल्यानंतर बऱ्याच काळापर्यंत त्याच्या बालपणीच्या आठवणींचा विचारही मी केला नव्हता. त्यांने मागे सोडलेल्या 'माय इयर्स विथ अपू'च्या कच्च्या आराखड्याला अंतिम रूप देण्याच्या प्रयत्नात हस्तलिखितावर काम करत होते. ते काम जेव्हा संपलं तेव्हा एक दिवस मला वाटलं की, 'चाईल्डहूड डेज'वर काम करण्याची वेळ आता आली आहे. माणिकसाठी ते किती महत्त्वाचं होतं हे इतर कुणाहीपेक्षा मला चांगलं माहीत आहे. खरं सांगायचं तर माझ्यासाठीही ते तितकंच महत्त्वाचं होतं कारण, त्याचा संबंध त्या काळाशी होता, जो माझ्याही जीवनाचा अविभाज्य भाग होता. याच कारणासाठी, इतर कुणावरही ही कामगिरी सोपवण्यापेक्षा जॉखोन छोटो छिलाम मी स्वत:च अनुवादित करण्याची जबाबदारी पत्करली.

माणिक आणि मी सोबतच मोठे झालो हे कदाचित फार लोकांना माहीत नाही. बालपणातल्या आम्हा दोघांच्या कित्येक आठवणी समान आहेत. त्यापैकी, बऱ्याच व्यक्त केल्या आहेत आणि उरलेल्यांना मी माझ्या मनात अजूनही कुरवाळत असते. या पुस्तकाची पानं उलटत जेव्हा मी त्याच्या सगळ्या जुन्या आठवणी वाचते, तेव्हा माझं मन नेहमीच आम्हा उभयतांच्या लहानपणीच्या एका विशिष्ट प्रसंगावर येऊन थबकतं. सांगतेच तो प्रसंग!

माणिक पटण्याच्या आमच्या घरी राहायला आला होता. एक दिवस, आमच्या एका माशीन (मावशी) (गायिका कॉनोक बिश्शाश) असं सुचवलं की, आम्हा दोघांत चित्रकलेची स्पर्धा ठेवावी. ही स्पर्धा ठेवण्याचं कारण, मला वाटतं, त्या वर्षी मी माझ्या चित्रकलेच्या वर्गात प्रथम आले होते. माणिक माझ्यापेक्षा लहान असल्यामुळे जरा गर्वानेच मी विचार केला की, बक्षीस मलाच मिळणार. प्रतिकृती बनवण्यासाठी आम्हा दोघांना एकच चित्र देण्यात आलं. आजही मला त्या चित्रातला प्रत्येक तपशील स्पष्टपणे आठवतोय. पिंजऱ्यातल्या पोपटाला खाऊ घालत असलेली, नीटनेटके वस्त्र परिधान केलेली एक युवती त्या चित्रात दाखवली होती. तिचे केस रिबनीने मागे बांधले होते आणि एका हातात तिने बाहुली पकडलेली होती. आमचं चित्रण जेव्हा संपलं, तेव्हा सगळ्यांनी माझ्या चित्राची स्तुती केली; पण जेव्हा माझ्या माँने (आई) माणिकचं चित्र पाहिलं तेव्हा ती तडक उद्‌गारली, ''माझ्या मते, बक्षीस माणिकलाच मिळायला हवं.'' यावर लगेच मी भोकाड पसरलं. ''अगं, रडतेस काय अशी?'' माझी माँ म्हणाली, ''जरा त्याच्या चित्राकडे बघ. तुलाच कळेल की, किती सुंदर चित्र काढलंय,'' रडत रडतच मी डोकं वर केलं आणि त्याचं चित्र पाहिलं. माझे अश्रू लगेच ओसरले. माझ्या चित्रापेक्षा खरोखरीच ते कैक पटींनी चांगलं होतं. मी अनेकदा खोडरबर वापरला होता. त्यामुळे माझं चित्र जरा मळकट झालं होतं. माणिकनी एकदाही खोडरबर वापरला नव्हता. त्याच्या रेषा इतक्या स्पष्ट होत्या की, एक क्षण असं वाटलं की, त्याचं चित्र मूळ चित्रापेक्षाही चांगलं आहे. बक्षीसपात्र कोण आहे याबद्दल आता माझ्या मनात जराही संशय राहिला नव्हता. त्यावेळी माणिक फक्त पाच वर्षांचा होता.

त्याच्या पुस्तकात माणिकने कॉनोक बिश्शाशचा उल्लेख केला आहे आणि पहिलं गाणं ध्वनिमुद्रित करायला गेली असताना ती किती घाबरली होती याचं वर्णन केलं आहे. फार मजेदार गोष्ट आहे ती; पण प्रत्येक वेळी ती वाचताना रेकॉर्डिंग स्टुडिओमध्ये माझी स्वत:ची उडालेली धांदल मला आठवते. संगीतावर माझंही निस्सीम प्रेम आहे. खरं तर संगीतावरच्या प्रेमानेच माणिक आणि मला जवळ आणलं. तारुण्यात मीही काही गाणी ध्वनिमुद्रित केली होती; पण प्रत्येक वेळी ध्वनिमुद्रणाला सुरुवात करण्याआधी अगदी न चुकता माझा घसा कोरडा